**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ (साक्षीदार) यांचा पुरावा</u> :–**

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करते की,

माझे नाव : प्रतिभा विजय बनसोडे,

वय : ४२ वर्षे, धंदा : मजुरी,

राहणार : वडाळामहादेव, ता. श्रीरामपुर, जि.अहमदनगर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सी. बी. अग्रवाल यांच्यातर्फे–</u>**

**१.** मी सर्व आरोपींना ओळखते. ते माझे नातेवाईक आहेत. आरोपी क्र.१ आजरोजी न्यायालयात हजर आहे. फिर्यादी हे माझे पती आहेत. घटना दिनांक २६/०२/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजताच्या दरम्यान माझ्या राहत्या घरी दरवाजासमोर वडगावरोड येथे घडली. घटनेच्या वेळेस मी अंघोळीला गेले होते. त्यावेळेस चारही आरोपी हे वडगाव रोड माझ्या घरासमोर आले असता त्यांचा मला जोराचा आवाज आला. मी दरवाजा उघडला असता चारही आरोपी हे माझ्या पतीला मारहाण करीत होते. आरोपी संदिप याने माझ्या पतीला डोक्यावर काठीने मारले. माझी जाउ निता ही माझ्या पतीला दगडाने मारीत होती. माझे सासु–सासरे हे हाता–पायाने माझ्या पतीला मारहाण करीत होते. त्यामुळे माझ्या पतीच्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर माझे चुलत दीर हनुमंत बनसोडे यांनी माझ्या पतीला उपचाराकरिता साखर कामगार हॉस्पीटल, श्रीरामपुर येथे नेले. आरोपी यांनी ज्या काठीने माझ्या पतीला मारहाण केली होती ती काठी मला न्यायालयासमक्ष दाखविल्यास मी ती काठी ओळखु शकते. आता मला गुन्हयातील जप्त काठी दाखविण्यात आली. ती तीच आहे. सदर जप्त काठीला यापुर्वीच आर्टिकल 'अ' देण्यात आलेले आहे. पोलिसांनी माझे बयान नोंदवुन घेतले होते.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ करिता वकील श्री. के. बी. शेख यांच्यातर्फे सुरु–</u>**

२. गुन्हयातील जप्त काठी आर्टिकल 'अ' पोलिसांना माझे पती फिर्यादी यांनी दिली होती. माझे सासु–सासरे हे आमच्यापासुन तीन वर्षापुर्वी वेगळे झाले आहेत. माझे सासु–सासरे यांनी शेती विकायला काढली त्यामुळे आमच्यात घरगुती वाद होवून ते वेगळे झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासु सास–यानी शेती विकायला काढली त्यामुळे मला त्यांचा राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेतीच्या कारणावरुन आमच्या परिवारात अनेकवेळा भांडण झाले आहे. आरोपी यांनी आमच्याविरुदध शेतीसंबंधी दिवाणी दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती हे माझ्या सास–यांना अर्धा एकर शेती नावावर करुन दया असे नेहमी म्हणत असे. आरोपी क्र.१ संदिप याने अर्धा एकर शेती स्वतः विकत घेतलेली आहे. आरोपी क्र.१ व आरोपी क्र.३ यांच्या नावे शेती असुन माझे पती फिर्यादी यांच्या नावे शेती नाही. हे

म्हणणे खरे आहे की, माझे सासरे आरोपी क्र.३ हे आरोपी क्र.१ यांच्यावर जीव लावतात व ते माझे पती फिर्यादी यांच्यावर जीव लावत नाहीत. पोलिस तपासकामी आमच्या घरी तीन वेळा आले होते. घटनेच्या दुस–या दिवशी पोलिस आमच्या घरी आले होते. पोलिसांनी माझे बयान घटनेच्या दुस–या दिवशी नोंदवुन घेतले होते.

३. फिर्यादी हे उपचारकामी दवाखान्यात भरती असताना आमच्या घरचे कोणीही सदस्य नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन केवळ तोंडी वाद झाला होता. पोलिसांनी तपासकामी मला आरोपींनी गुन्हयात वापरलेला दगड मागितला नाही. फिर्यादीचे शर्ट व पॅन्ट रक्ताने माखलेले होते. फिर्यादी हे घटनेनंतर जखमी होवून बेशुध्द झाले नव्हते. भांडणाची सोडवासोडव करण्याकरिता सुनिल पवार हे आले होते. माझ्या पतीला हनुमंत यांनी मोटारसायकलने दवाखान्यात नेले होते. माझ्या पतीला चारचाकी वाहनाने दवाखान्यात नेले नाही.भांडणाची सोडवासोडव करण्याकरिता मी गेली नाही. सदरचे भांडण हे दोन ते पाच मिनिट सुरु होते. मी घराबाहेर येईपर्यंत भांडण संपले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, माझ्या पतीला चारही आरोपींनी मारहाण केली होती. गुन्हयातील जप्त लाकडासारखे लाकुड बाजारात सहज मिळु शकतात. हे म्हणणे खरे नाही की, शेतीच्या अभिलाषाने आम्ही आरोपींविरुदध खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्यानुसार कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : २८/०१/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.